**Government of Maharashtra**
**Maharashtra State Council of Educational Research & Training (Academic Authority)**
Sadashiv Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020)24476938, 24475571
Website : www.maa.ac.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण)**
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र. (०२०) 24476938, 24475571
ईमेल : curriculumdept@maa.ac.in

जा.क्र.मराशैसंप्रप/अविवि/इ. १० वी विषययोजना व मूल्यमापन/२०१८-१९/२७३३ / दिनांक : १४/०६/२०१८

**परिपत्रक**

**प्रति,**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व)
३. शिक्षण निरिक्षक,(दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई
४. शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)

**विषय : इयत्ता १० वी पुनर्रचित अभ्यासक्रम,विषययोजना, मूल्यमापन आणि तासिका नियोजनाबाबत ....**

या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व माध्यमिक शाळा प्रमुखांना कळवण्यात येते, की गतवर्षी इ. ९ वी भाषा विषयांची कृतिपत्रिकांद्वारे मूल्यमापन योजना सुरू केली आहे. NCF – 2005 व SCF – 2010 च्या अनुषंगाने सर्वच विषयांचा अभ्यासक्रम पुनर्रचित करून त्यांच्या विषययोजना व मूल्यमापन योजनेमध्ये बदल करण्यात आलेले आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इयत्ता ९ वीची पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४ यांचे परिपत्रक क्रमांक रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९ वी पुनर्रचित अभ्यासक्रम/विषय योजना, तासिका नियोजन व मूल्यमापन योजना/३९६, दिनांक २८.७.२०१७ नुसार त्याची कार्यवाही शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये करण्यात आलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इयत्ता १० वी साठी पुनर्रचित अभ्यासक्रम व नवीन पाठ्यपुस्तके याबाबत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे यांचेमार्फत कार्यवाही होत आहे. त्यानुसार अभ्यासक्रम पुनर्रचनेच्या आधारे विषय रचनेत बदल करण्यात आलेले आहेत व त्यानुसार पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**(अ) इ. १० वीसाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नव्याने प्रकाशित झालेली पाठ्यपुस्तके पुढीलप्रमाणे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **प्रथम भाषा** | कुमारभारती (आठ) | माध्यम | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराथी, कन्नड, तेलुगु, सिंधी (अरेबिक)) |
| (२) | **द्वितीय भाषा/ संपूर्ण/संयुक्त** | मराठी | – संपूर्ण | |
| | | (दोन) | – संयुक्त | |
| | | हिंदी | – संपूर्ण | |
| | | (दोन) | – संयुक्त | |
| | | उर्दू | – संपूर्ण | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (दोन) – संयुक्त | | |
| | | गुजराथी – संपूर्ण | | |
| | | (दोन) – संयुक्त | | |
| | | कन्नड (एक) | | |
| | | तेलुगु (एक) | | |
| | | सिंधी (दोन) | | (अरेबिक/देवनागरी) |
| (३) | **तृतीय भाषा** | इंग्रजी My English Course Book | | एक |
| (४) | **गणित** | गणित भाग १ | आठ | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराथी, कन्नड, तेलुगु, सिंधी) |
| | | गणित भाग २ | आठ | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराथी, कन्नड, तेलुगु, सिंधी) |
| (५) | **विज्ञान** | विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग १ आणि भाग २ | आठ | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराथी, कन्नड, तेलुगु, सिंधी) |
| (६) | **इतिहास व राज्यशास्त्र** | इतिहास व राज्यशास्त्र | आठ | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराथी, कन्नड, तेलुगु, सिंधी) |
| (७) | **भूगोल** | भूगोल | आठ | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराथी, कन्नड, तेलुगु, सिंधी) |
| (८) | **संस्कृत** | (संपूर्ण) | एक | |
| | | (संयुक्त) | एक | |
| (९) | **स्व विकास व कला रसास्वाद** | | आठ | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराथी,कन्नड,तेलुगु, सिंधी) |
| (१०) | **संरक्षणशास्त्र (कार्यपुस्तिका)** | | चार | (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू ) |

**(ब)** शैक्षणिक वर्ष २०१८– १९ पासून इयत्ता १० वी साठी 'माहिती संप्रेषण तंत्रज्ञान' (आय.सी.टी.) हा विषय स्वतंत्र न राहता आय.सी.टी. चा समावेश एकात्मिक स्वरूपात सर्व विषयांमधून करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याचे स्वतंत्र पाठ्यपुस्तक असणार नाही.

**(क)** शैक्षणिक वर्ष २०१८– १९ पासुन इयत्ता १० वी साठी गणित या विषयास 'सामान्य गणित' हा विषय पर्याय राहणार नाही. सर्वांसाठी गणित भाग १ व भाग २ (बीजगणित व भूमिती) हीच पाठ्यपुस्तके राहतील.

**(ड)** सामाजिकशास्त्रे विषयांतर्गत भूगोल विषयाबरोबर अर्थशास्त्र हा स्वतंत्र विषय न राहता भूगोल व गणित या दोन्ही विषयांत अर्थशास्त्रविषयक क्षमताविधाने व पूरक आशय यांचा समावेश केलेला आहे.

**(इ)** शालेय प्रमाणपत्र श्रेणी विषयांची पुनर्रचना व विषयात बदल केलेले आहेत. व्यक्तिमत्व विकास, कार्यानुभव, समाजसेवा व व्यवसाय मार्गदर्शन या विषयांऐवजी 'स्व–विकास व कला रसास्वाद' या आशयाचा एक विषय राहील.

(फ) शालेय प्रमाणपत्र विषयात संरक्षणशास्त्र हा विषय राहील. त्यास पूर्वीप्रमाणे एम.सी.सी. (फक्त इयत्ता ९ वी) स्काऊट गाईड, नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा, एन.सी.सी. हे विषय पर्याय म्हणून राहतील.

(ग) शिक्षण व्यवसायाभिमुख व्हावे या दृष्टीने (राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान) (RMSA)अंतर्गत "National Skill Qualification Framework" (NSQF) चे इ.९ वी व १० वी स्तरावर एकूण १० विषय सुरू करण्यात आलेले असून हे विषय शासन आदेशानुसार **इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना तृतीय भाषा अथवा सामाजिकशास्त्रे या विषयास पर्याय म्हणून तर इंग्रजी व्यतिरिक्त इतर उर्वरित माध्यमाच्या विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा अथवा सामाजिकशास्त्रे या विषयास पर्याय म्हणून निवडता येतील.** सदर विषय राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांनी ज्या निवडक शाळांना NSQF चे विषय सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यांनाच विषय सुरु करता येतील.

प्रचलित पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (V1, V2, V3) यास "Pandit Sundarlal Sharma Central Institute Of Vocational Education, Bhopal" (PSSCIVE) यांची मान्यता असल्याने व त्यास शालेय शिक्षण विभागाने मान्यता दिलेली असल्याने 'नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क'' (NSQF) च्या विषयाप्रमाणेच वरीलप्रमाणेच भाषा व सामाजिकशास्त्रे या विषयास पर्याय म्हणून अभ्यासता येतील. परंतु हे विषय घेण्यास व्यवसाय शिक्षण संचालनालयाने ज्या शाळांना मान्यता दिलेली आहे त्याच शाळांना हे विषय निवडता येतील. याची अंमलबजावणी इ. १० वी साठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून होईल.

(१) **भाषा विषय**

(अ) त्रिभाषा सूत्रानुसार माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांस तीन भाषा विषय असणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे प्रथम भाषा, द्वितीय भाषा (संपूर्ण किंवा संयुक्त) व तृतीय भाषा येतात. १०० गुणांच्या भाषा विषयामध्ये १०० गुण लेखी परीक्षा तर ५० गुणांच्या भाषा विषयासाठी ५० गुण लेखी परीक्षा तर दोन्ही सत्र परीक्षेत स्वतंत्रपणे ५० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन अशी विभागणी राहील. दहावीचे अंतिम मूल्यमापन हे परीक्षेनुसार १००/५० गुणांच्या लेखी परीक्षेनुसारच होईल. परंतु शालेय स्तरावर इयत्ता नववीप्रमाणेच अंतर्गत मूल्यमापनाची कार्यवाही करण्यात यावी हे अपेक्षित आहे.

(आ) शालेय स्तरावर इयत्ता १० वी साठी मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना इंग्रजी (तृतीय) ऐवजी इंग्रजी (प्रथम) भाषा अभ्यासण्याची पर्यायी तरतूद/सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(इ) शालेय स्तरावर इयत्ता १० वीसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठी (द्वितीय) ऐवजी मराठी (प्रथम) भाषा अभ्यासण्याची पर्यायी तरतूद/सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. उपरोक्त (अ) आणि (आ) प्रमाणे इंग्रजी प्रथम भाषा व मराठी प्रथम भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना राहील व त्याची प्रचलित पद्धतीप्रमाणे कार्यवाही सुरु राहील.

(ई) माध्यमिक स्तरावरील तमिळ, मल्याळम , बंगाली, पंजाबी (प्रथम, द्वितीय/ संयुक्त - संपूर्ण व संयुक्त), पाली अर्धमागधी, पर्शियन, अरेबिक, अवेस्ता, पहलवी (अभिजात भाषा), फ्रेंच , जर्मन, रशियन (परकीय) या भाषांचे प्रचलित अभ्यासक्रम तसेच पाठ्यपुस्तके सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी कायम राहतील परंतु भाषा विषयाप्रमाणे या इतर भाषांसाठी कृतिपत्रिका तयार करण्यात येतील व त्याआधारे मूल्यमापन होईल.

(२) **गणित भाग १ व भाग २** (बीजगणित व भूमिती) हा विषय १०० गुणांचा राहील. १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २० गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी राहतील. गणित भाग १ (बीजगणित) ४० गुण + गणित भाग २ (भूमिती) ४० गुण

याप्रमाणे ८० गुणांची लेखी परीक्षेसाठी विभागणी राहील व २० गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी राहतील. या विषयासाठी प्रचलित पद्धतीप्रमाणेच २ स्वतंत्र प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका राहतील. प्रचलित पद्धतीप्रमाणे सामान्य गणित हा पर्यायी स्वतंत्र विषय राहणार नाही. गणित भाग १ व गणित भाग २ अशी दोन स्वतंत्र पाठ्यपुस्तके राहतील.

(३) **विज्ञान आणि तंत्रज्ञान :** इयत्ता १० वी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांची दोन स्वतंत्र पाठ्यपुस्तके देण्यात आली असून लेखी परीक्षेसाठी पेपर १=४० गुण व पेपर २ =४० गुण याप्रमाणे दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका राहतील. तर ४० गुणांच्या लेखी परीक्षेमध्ये पेपर १ मध्ये भौतिकशास्त्र व रसायशास्त्र मिळून ४० गुण तसेच पेपर २ मध्ये जीवशास्त्र व विज्ञानाशी संबंधित इतर विषय (पर्यावरण, हवामानशास्त्र, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी.) असे ४० गुण राहतील व उर्वरित २० गुण प्रात्यक्षिक परीक्षेस राहतील.

(४) **सामाजिकशास्त्रे :** इतिहास + राज्यशास्त्र या विषयासाठी एक आणि भूगोल या विषयासाठी एक अशी दोन स्वतंत्र क्रमिक पाठ्यपुस्तके राहणार असून या विषयाच्या गुणांची विभागणी इतिहास ४० गुण + राज्यशास्त्र २० गुण व भूगोल ४० गुण याप्रमाणे लेखी परीक्षेसाठी एकूण १०० गुणांची परीक्षा राहणार असून इतिहास व राज्यशास्त्र आणि भूगोल अशा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका राहतील.

**टिप : इयत्ता १० वीच्या सर्व विषयांसाठी अंतिम परीक्षेसाठी इयत्ता ९ वीतील घटकांवरील आधारित असे २०% प्रश्न असावेत. (भाषा विषयांसाठी उपयोजित लेखन व व्याकरण संदर्भात तर भाषेतर विषयांसाठी इयत्ता दहावीच्या संदर्भात जो आशय इयत्ता ९ वी साठी घेण्यात आला आहे अशा आशयाचे मूलभूत ज्ञान) म्हणजे १०० गुणांच्या परीक्षेसाठी ८०% भारांश हा इयत्ता दहावीच्या अभ्यासक्रमावर तर २०% भारांश इयत्ता नववीच्या अभ्यासक्रमावर असावा व त्याप्रमाणे प्रश्नपत्रिका संपादन होणे आवश्यक आहे.)**

(५) **NSQF चे व्यवसाय विषय :** NSQF प्रमाणे PSSCIVE ने तयार केलेले व्यवसाय विषय (ट्रेड) केंद्रशासनातर्फे ''राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान'' (RMSA) अंतर्गत शासकीय माध्यमिक शाळांमध्ये सुरू करण्यात आलेले आहेत. त्या विषयांसाठी १०० गुण राहतील. त्यामध्ये ३० गुण लेखी परीक्षा व ७० गुण प्रात्यक्षिक परीक्षा याप्रमाणे राहतील. सदर विषय माध्यमिक शाळांना परस्पर सुरु करता येणार नाही. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान या अंतर्गत सुरू झालेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या विषयांच्या खालील (इ.१० वी साठी) यादीतील कोणताही एक विषय शाळांना निवडता येईल.

| | |
|---|---|
| १. मल्टी स्किल फाऊंडेशन कोर्स (८१) | २. ऑटोमोबाईल सर्व्हिस टेक्निशियन (८२) |
| ३. रिटेल मर्चडायझिंग (८३) | ४. हेल्थकेअर जनरल ड्युटी असिस्टंट (८४) |
| ५. ब्युटी अँड वेलनेस (८५) | ६. फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस (८६) |
| ७. टुरिझम अँड ट्रॅव्हल (८७) | ८. ॲग्रिकल्चर (८८) |
| ९. मिडिया अँड एन्टरटेनमेंट | १०. बँकिंग अँड फायनान्शिअल सर्व्हिस (९०) |

**प्रचलित पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम V1, V2, V3 या विषयांसाठी खालीलप्रमाणे चार विषय असतील.**

१. मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (IBT) (८१)/मल्टी स्किल फाऊंडेशन कोर्स (८१)
२. मेकॅनिकल टेक्नालॉजी (९१)
३. इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी (९२)
४. इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (९३)

उपरोक्त चार विषयांपैकी कोणताही एक विषय निवडता येईल. या ४ पैकी विषय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना वरील NSQF च्या १० विषयातून विषयाची निवड करता येणार नाही. पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाची अंमलबजावणी प्रचलित पद्धतीप्रमाणेच राहील. ज्या शाळांना V1, V2, V3 या व्यवसाय अभ्यासक्रमाची परवानगी आहे. त्यांनीच उपरोक्त विषयातील एका विषयाची निवड इ.९ वी करता शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी मुख्य विषय म्हणून केली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इयत्ता १० वी साठी हे विषय श्रेणी विषय म्हणून आता राहिले नाहीत.

NSQF मधील मल्टी स्कील फाऊंडेशन कोर्स (८१) प्रचलित अभ्यासक्रमातील मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (V1) ह्या विषयांचा अभ्यासक्रम जरी सारखा असला तरी NSQF अंतर्गत शाळांना हा विषय 'मल्टी स्कील फाऊंडेशन कोर्स' म्हणून तर प्रचलित पूर्व व्यवसाय अभ्यासक्रमाच्या शाळांनी 'मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख' म्हणूनच घ्यावयाचा आहे. दोन्ही विषयांसाठी सांकेतांक (८१) राहील.

उत्तीर्णतेचे निकष

(१) **भाषा विषय :** ३०० गुणांच्या तीन भाषा विषयांचा गट उत्तीर्णतेसाठी एकत्रित असेल. या तीन भाषा विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान १०५ गुण आवश्यक राहतील आणि त्यापैकी १०० गुणांच्या प्रत्येक भाषा विषयामध्ये किमान २५% (म्हणजे १०० पैकी किमान २५ गुण) आणि संयुक्त भाषा विषयाच्या ५० गुणांच्या भाषा विषयात किमान २५ % (म्हणजे ५० पैकी किमान १३) गुण आवश्यक राहतील. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत सुरु झालेले व्यवसाय विषय हे भाषा विषयाऐवजी घेण्यात आल्यास त्यांना एकत्रित उत्तीर्णतेच्या लाभाची सवलत व्यवसाय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना देता येणार नाही.

(२) **गणित व विज्ञान आणि तंत्रज्ञान :** प्रचलित पद्धतीप्रमाणे उत्तीर्णतेसाठी गणित व विज्ञान विषयाचा एकत्रित गट असेल. या दोन विषयांच्या एकत्रित गटामध्ये २०० गुणांपैकी उत्तीर्णतेसाठी किमान ७० गुण आवश्यक आहेत व प्रत्येक विषयात किमान २५ % म्हणजे विज्ञान विषयात १०० पैकी किमान २५ व गणित विषयात १०० पैकी किमान २५ गुण आवश्यक राहतील.

**इयत्ता दहावीचा वार्षिक निकाल खालीलप्रमाणे तयार होईल.**

**१. भाषा विषय – १०० गुणांची अंतिम लेखी परीक्षा राहील. (इतर भाषांसह)**

**२. संयुक्त भाषा विषयांसाठी – प्रत्येकी ५० गुणांची अंतिम लेखी परीक्षा राहील. (इतर भाषांसह)**

**टीप : उपयोजित लेखन** – रचना विभागातील रचनांचे प्रत्यक्ष सादरीकरण अपेक्षित असून गटचर्चा, व्यक्तिगत प्रकाराने करून घेणे. वर्ग स्तरावर मूल्यमापन व्हावे. उदा. निबंधस्पर्धा, जाहिरात सादरीकरण स्पर्धा इत्यादी. विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धा पूर्वनियोजित नसाव्यात.

**उपक्रम** – कोणत्याही भाषेचा उद्देश साध्य करण्यासाठी सतत केल्या जाणाऱ्या कृतींचा समूह म्हणजे उपक्रम होय. भाषिक ज्ञान वाढवणारे सहज उपलब्ध साहित्यातून करता येणारे अनुभवविश्व वयानुरूप असावेत. पाठाखाली असे उपक्रम देण्यात आले आहेत ते घेण्यात यावे. उदा. परिपाठाच्या तासाला आठवड्यातील वर्तमानपत्रात आलेल्या मुख्य मुद्द्याची व बातम्यांची पारदर्शकतेने निवड करून वाचन करणे.

**क्षमतावाचन** – भाषण, संभाषण क्षमतेकरता कविता, दोहे सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्याकरता गटात चर्चा करणे इत्यादी. एका सत्रात एकच उपक्रम घेणे अपेक्षित आहे.

(टीप : माध्यमिक स्तरावरील तमिळ, मल्याळम , बंगाली, पंजाबी (प्रथम, द्वितीय/ संयुक्त – संपूर्ण व संयुक्त), पाली अर्धमागधी, पर्शियन, अरेबिक, अवेस्ता, पहलवी (अभिजात भाषा), फ्रेंच , जर्मन, रशियन (परकीय) या भाषांचे प्रचलित अभ्यासक्रम तसेच पाठ्यपुस्तके सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी कायम राहत आहेत परंतु भाषा विषयांप्रमाणे कृतिपत्रिकांच्या आधारे १०० व ५० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.)

**३. गणित विषय (बीजगणित व भूमिती )**

**अंतिम लेखी परीक्षा**

गणित भाग १ (बीजगणित) – ४० गुण (वेळ २ तास)

गणित भाग २ (भूमिती) – ४० गुण (वेळ २ तास)

**अंतर्गत मूल्यमापन**

| | | |
|---|---|---|
| गणित भाग १ प्रात्यक्षिक | ५ गुण | **२० गुण** |
| गणित भाग २ प्रात्यक्षिक | ५ गुण | |
| गणित भाग १ ची चाचणी परीक्षा | ५ गुण | |
| गणित भाग २ ची चाचणी परीक्षा | ५ गुण | |

**एकूण = १०० गुण**

गणित भाग १ व २ साठी प्रत्येक सत्रामध्ये २० गुणांची प्रत्येकी १ चाचणी घेतली जावी. दोन्ही सत्रांमध्ये घेण्यात आलेल्या चाचण्यांमध्ये मिळालेल्या गुणांचे ५ गुणांमध्ये रुपांतर करण्यात यावे. गुणांचे रुपांतरण करताना अपूर्णांकामध्ये रुपांतरण येत असल्यास ०.५ किंवा त्यापेक्षा अधिक अपूर्णांकामध्ये गुण येत असल्यास पुढील पूर्णांकामध्ये गुण रुपांतरीत करावेत त्यापेक्षा कमी अपूर्णांकामध्ये गुण आल्यास त्याच्या अलिकडील पूर्णांकाइतके गुण करण्यात यावेत.

**वार्षिक निकाल :** गणित भाग १ साठी १० गुण, व गणित भाग २ साठी १० गुण याप्रमाणे एकूण २० गुणांची **गणित प्रात्यक्षिक परीक्षा** शालेय स्तरावर घेतली जाणे अपेक्षित आहे.

**४. विज्ञान व तंत्रज्ञान**

**लेखी परीक्षा**

पेपर १ – ४० गुण (वेळ २ तास)

पेपर २ – ४० गुण (वेळ २ तास)

**प्रात्यक्षिक परीक्षा व उपक्रम = २० गुण**

प्रयोग – १२ गुण (पेपर १ – ६ गुण + पेपर २ – ६ गुण)

नोंदवही – ४ गुण (पेपर १ – २ गुण + पेपर २ – २ गुण)

उपक्रम नोंदणी – ४ गुण (पेपर १ – २ गुण + पेपर २ – २ गुण)

**एकूण – १०० गुण**

**टीप : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोध मंडळाने (बालभारती ) प्रात्यक्षिक कार्य नोंदवही तयार केलेली आहे . त्या नोंदवहीत प्रात्यक्षिक कार्याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार प्रात्यक्षिकांची सर्व कार्यवाही पूर्ण करावी. उपक्रम पाठांच्या शेवटी देण्यात आले आहेत.**

५. **सामाजिकशास्त्रे : अंतिम लेखी परीक्षा**

इतिहास व राज्यशास्त्र ४०+२० = ६० गुण (वेळ २.३० तास)

भूगोल ४० गुण (वेळ २ तास)

**एकूण १०० गुण**

सामाजिकशास्त्रे या विषयासाठी प्रचलित मूल्यमापनातील अंतर्गत गुण शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इ.१० वीसाठी राहणार नाहीत. विद्यार्थ्यांची अभ्यासूवृत्ती व गुणवत्ता वाढावी तसेच जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून प्रत्येक सत्रात घटक चाचणी अथवा उपक्रम घ्यावेत. परंतु त्यांचे गुण सरासरी गुणांसाठी धरण्यात येऊ नयेत.

६. **NSQF व्यवसाय अभ्यासक्रम** (१० वी) व पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम ९ वी (एकूण ४ विषय) माध्यमिक स्तर

**अंतिम परीक्षा**

| | |
|---|---|
| चाचणी परीक्षा | ०५ गुण (२० गुणांची परीक्षा घेऊन ०५ गुणात रूपांतर करणे) |
| लेखी परीक्षा | ३० गुण (८० गुणांची परीक्षा घेऊन ३० गुणात रूपांतर करणे) |
| प्रात्यक्षिक परीक्षा | ३० गुण |
| टर्म वर्क/जर्नल | ०५ गुण |
| प्रोजेक्ट | १० गुण |
| तोंडी परीक्षा | १० गुण |
| प्रत्यक्ष निरीक्षण | १० गुण (प्रात्यक्षिक परीक्षा दरम्यान घेतलेली सुरक्षितता व स्वच्छता इत्यादी.) |
| **एकूण** | **१०० गुण** |

## शालेय श्रेणी विषय

**अनिवार्य विषय**

१. **आरोग्य व शारीरिक शिक्षण :** आरोग्य व शारीरिक शिक्षण हा **शालेय श्रेणीचा अनिवार्य विषय** असून या विषयासाठी **प्रचलित अभ्यासक्रमानुसार** घटक निहाय भारांश देऊन क्षमता निश्चित कराव्यात. विद्यार्थ्यांच्या शारीरिक सुदृढतेवर विशेष भर दयावा. लेखी परीक्षा घेऊ नये. तथापि उपक्रमांच्या तात्त्विक भागांचे लेखन कार्य अपेक्षित आहे. निश्चित केलेल्या क्षमतांनुसार प्रथम सत्र व द्वितीय सत्रात स्वतंत्रपणे प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ घेऊन मूल्यमापन करावे.

वार्षिक निकालपत्रक तयार करताना प्रथम सत्रातील गुण, द्वितीय सत्रातील गुण एकत्र करून सरासरीनुसार त्या गुणांचे श्रेणीत रुपांतर करावे.

| क्र | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र | | | द्वितीय सत्र | | | एकूण | सरासरी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखन कार्य | प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ | एकूण (अ) | लेखन कार्य | प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ | एकूण (ब) | (अ+ब) | $\frac{अ+ब}{२}$ | |
| | | (५०) | (५०) | (१००) | (५०) | (५०) | (१००) | २०० | १०० | |
| | | | | | | | | | | |

२. **स्व–विकास व कलारसास्वाद :** स्व–विकास व कलारसास्वाद या विषयाचे मूल्यमापन करताना पाठ्यपुस्तकात प्रकरण निहाय दिलेल्या मूल्यमापन आराखड्याचा वापर करावा. लेखी परीक्षा घेऊ नये. प्रकरणनिहाय दिलेल्या भारांशाप्रमाणे शिक्षकांच्या नोंदी व विद्यार्थ्यांची नोंदवही यावरून गुणदान करावे.

वार्षिक निकालपत्रक तयार करताना प्रथम सत्रातील गुण, द्वितीय सत्रातील गुण एकत्र करून सरासरी नुसार त्या गुणांचे रूपांतर श्रेणीत करावे. विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रकात ती श्रेणी दर्शवण्यात यावी.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र (५०) | द्वितीय सत्र (५०) | एकूण १०० | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**शालेय श्रेणी विषय : वैकल्पिक विषय**

संरक्षणशास्त्र/एम.सी.सी. (फक्त इयत्ता ९ वी)/ स्काऊट गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा / एन.सी.सी. यापैकी कोणताही **एक** विषय शाळेने आपल्या सोयीनुसार निवडावा.

(१) **संरक्षणशास्त्र :** या विषयाचे मूल्यमापन करताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.

१. या विषयासाठी लेखी परीक्षा नाही.

२. संरक्षणशास्त्र कार्यपुस्तिकेत दिलेल्या लेखी कामासाठी ४०% भारांश आणि कृती/प्रात्यक्षिक, चर्चा, क्षेत्रभेट, यासाठी ६०% भारांश ठेवण्यात आला आहे.

३. स्थानिक उपलब्ध परिस्थितीनुसार निर्धारित उपक्रमासोबत इतर उपक्रमाचेही आयोजन करण्यास हरकत नाही. तथापि निर्धारित उपक्रम घेणे आवश्यक आहे.

संरक्षणशास्त्र इयत्ता १० वीच्या कार्यपुस्तिकेत दिलेल्या उपक्रमांची सर्वसाधारण विभागणी पुढीलप्रमाणे आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी केलेल्या लेखी आणि कृती कार्याचे मूल्यमापन करताना सर्वसाधारणपणे पुढील निकष वापरावेत.

**(अ) लेखीकामावर आधारित उपक्रम**

(१) उपक्रमाची मांडणी

(२) घटकनिहाय आलेले मुद्दे

(३) वापरलेले संदर्भ, साहित्य, पुस्तके, इंटरनेट इत्यादी.

(४) मुद्द्यांची क्रमबद्ध मांडणी

(५) स्वत:चे मत, विचार, स्पष्टता

(६) लेखनाची सुरुवात, मध्य, शेवट, लेखनाची शैली तांत्रिक बाबी या निकषांचा विचार करावा.

(ब) **कृतीकार्य – चर्चा, क्षेत्रभेट, मुलाखती, इंटरनेटचा वापर, चित्रे, कात्रणे, नकाशावाचन, आराखडा तयार करणे इत्यादी.**

(१) कृतीत स्वत:हून सहभाग घेणे.

(२) कृतीतील सहजता, सातत्य, उत्स्फूर्तपणा इत्यादी.

(३) कृतीचा मुद्देसूद अहवाल लिहिणे.

(४) क्षेत्रभेट – संबंधित व्यक्ती, संस्था यांची परवानगी, आभार इत्यादी.

(५) मुलाखतीसाठी पूर्व तयारी, प्रत्यक्ष मुलाखत, आभार इत्यादी निकषांचा विचार करावा.

(क) **संकलित मूल्यमापन:** प्रथम व द्वितीय सत्रातील मूल्यमापन स्वतंत्रपणे करावे व त्यानुसार वर्षाअखेरीस दिलेल्या सारणीनुसार संकलित गुणपत्रक तयार करणे.

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र | | | द्वितीय सत्र | | | एकूण (अ+ब) | सरासरी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखी काम | उपक्रमातील प्रत्यक्ष सहभाग | एकूण (अ) | लेखी काम | उपक्रमातील प्रत्यक्ष सहभाग | एकूण (ब) | | अ+ब / २ | |
| | | (४०) | (६०) | (१००) | (४०) | (६०) | (१००) | २०० | १०० | |

**सरासरी १०० गुण सरासरी गुणाचे श्रेणीत रुपांतर करावे व ती श्रेणी विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रकात दर्शवण्यात यावी.**

(२) **एम. सी. सी. (इयत्ता ९ वी साठी ):** वैकल्पिक गटातील शालेय श्रेणींच्या विषयांपैकी एम.सी.सी. हा विषय फक्त इयत्ता ९ वी साठीच राहील. एम. सी. सी. हा विषय विद्यार्थ्यांना ऐच्छिक स्वरूपाचा परंतु माध्यमिक शाळांना मात्र अनिवार्य राहील. संबंधित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र छात्र सेना या विषयाचे प्रमाणपत्र शाळेमार्फतच देण्यात येईल.

(३) **स्काऊट /गाईड** : स्काऊट गाईड या विषयासाठी महाराष्ट्र स्काऊट गाईड संस्थेने निर्धारित केलेला पाठ्यक्रम व मूल्यमापन पद्धतीनुसार मूल्यमापन करावे. विद्यार्थ्यांच्या अंतिम निकालपत्रकात श्रेणी दर्शवण्यात यावी.

(४) **नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा :** नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा या विषयासाठी प्रचलित अभ्यासक्रमानुसार क्षमता निश्चित कराव्यात. क्षमता निश्चित करताना विद्यार्थ्यांचा वयोगट, पूर्वज्ञान, आकलनक्षमता या बाबींचा विचार करावा. लेखन कार्यासाठी स्वतंत्र २०० पानी वही करावी. त्यामध्ये चित्रे, आकृत्या, तात्विक माहिती, नामनिर्देशित आकृत्या, वैशिष्ट्यपूर्ण नोंदी इत्यादींचा समावेश असावा.

प्रात्यक्षिक परीक्षा व नोंदवही असे प्रत्येकी ५० गुण देऊन प्रत्येक सत्रात (१०० गुण) स्वतंत्रपणे मूल्यमापन करावे. अंतिम निकालपत्रात २०० गुणांचे रुपांतर १०० गुणांत करून श्रेणी द्यावी. लेखी परीक्षा घेऊ नये.

(५) **एन. सी. सी.**

या विषयाची कार्यवाही केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या प्रचलित पद्धतीप्रमाणे लागू राहील. विद्यार्थ्यांच्या अंतिम निकालपत्रकात श्रेणी दर्शवण्यात यावी.

**श्रेणी तक्ता (सर्व श्रेणी विषयांसाठी)**

| अ.क्र. | मिळालेले गुण (टक्के) | श्रेणी |
|---|---|---|
| १ | ६० % व त्यापेक्षा अधिक | अ |
| २ | ४५% व त्यापेक्षा अधिक परंतु ६०% पेक्षा कमी | ब |
| ३ | ३५% व त्यापेक्षा अधिक परंतु ४५% पेक्षा कमी | क |
| ४ | ३५ % पेक्षा कमी गुण | ड |

**विषय योजना व तासिका (इ.१० वी) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पुढे**

**परिशिष्ट – अ**

| अ.क्र. | विषय | तासिका |
|---|---|---|
| १. | प्रथम भाषा | ०६ |
| २. | द्वितीय भाषा किंवा संयुक्त भाषा | ०६ |
| ३. | तृतीय भाषा | ०७ |
| ४. | गणित (बीजगणित + भूमिती )/ भाग १ व भाग २ | ०७ |
| ५. | विज्ञान आणि तंत्रज्ञान | ०८ |
| ६. | सामाजिकशास्त्रे- (अ) इतिहास व राज्यशास्त्र (०४ तासिका) (ब) भूगोल (०३ तासिका) | ०७ |
| | **शालेय श्रेणी विषय** | |
| ७. | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ०३ |
| ८. | स्व-विकास व कलारसास्वाद | ०२ |
| ९. | संरक्षणशास्त्र/स्काऊट-गाईड /नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन. सी. सी. | ०२ |
| | **एकूण** | **४८** |
| १०. | NSQF चे व्यवसाय विषय व पूर्व व्यवसाय विषय | १२ |

**NSQF विषय व पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम ज्या विषयास पर्याय म्हणून निवडले असतील त्या विषयांसाठी असणाऱ्या तासिका वेळापत्रकात राहतील व उर्वरित तासिका वेळापत्रकाबाहेर राहतील.**

**सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता नववी साठी उपरोक्तप्रमाणे विषय आणि तासिका लागू राहतील. स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असल्यास मुख्याध्यापकांनी तासिका विभागणीत थोडी लवचिकता ठेवणेस हरकत नाही.**

## परिशिष्ट 'ब' मूल्यमापन योजना इ.१० वी (शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पुढे )

| अ.क्र | विषय | लेखी परीक्षा | | | अंतर्गत/प्रात्यक्षिक परीक्षा | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्नपत्रिका संख्या | गुण | कालावधीतास | गुण | कालावधी तास | |
| १. | प्रथम भाषा | ०१ | १०० | ०३ | - | - | १०० |
| २. | द्वितीय भाषा किंवा संयुक्त भाषा | ०१ | १००<br>५०+ ५० | ०३<br>२+२ | - | - | १०० |
| ३. | तृतीय भाषा | ०१ | १०० | ०३ | - | - | १०० |
| ४. | गणित<br>(बीजगणित+ भूमिती) | ०२ | ४०+४० | ०२ तास प्रत्येकी | २० गुण | - | १०० |
| ५. | विज्ञान आणि तंत्रज्ञान | ०२ | ४०+४० | ०२ तास प्रत्येकी | २० गुण | १ तास ३० मिनिटे | १०० |
| ६. | सामाजिकशास्त्रे<br>अ) इतिहास व राज्यशास्त्र<br>ब) भूगोल | <br>०१<br>०१ | <br>६०<br>४० | <br>२.३० तास<br>२ तास | | | १०० |
| ७. | NSQF व्यवसाय विषय<br>(भाषा व सामाजिकशास्त्रे विषयास पर्याय) | ०१ | ३०<br>(८० गुणांची परीक्षा घेऊन ३० गुणात रुपांतर) | ३ तास | ७० गुण | ३ तास | १०० |
| ८. | आरोग्य व शारीरिक शिक्षण | - | - | - | - | - | श्रेणी |
| ९. | स्व-विकास व<br>कलारसास्वाद | - | - | - | - | - | श्रेणी |
| १०. | संरक्षणशास्त्र /स्काऊट गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. | - | - | - | - | - | श्रेणी |
| | एकूण | | | | | | ६०० गुण |

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इयत्ता १० वीसाठी ही मूल्यमापन योजना लागू करण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.** याप्रमाणे सर्व सूचना आपल्या आखत्यारीतील सर्व माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या www.ebalbharati.in, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या www.maa.ac.in, आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या www.mahasscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हे परिपत्रक उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(डॉ. सुनिल मगर)
**संचालक,**
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे ३०.

**प्रत : माहितीस्तव**

(१) अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
(२) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
(३) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
(४) अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.
(५) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे ४११ ००१.
(६) विशेष कार्य अधिकारी, मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई.
(७) विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे (महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ)